# महासरस्वती



# अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका
फेब्रुवारी २०२६
वर्ष ५१ अंक ०२



श्रीमाताजी

# अभीप्सा

(ईश्वराप्रति असलेली आस)

**प्रकृती ती जड । करील उघड । ईश्वरी ते रूप । सुघटित ।।**

---

**प्रकाशक**

श्री. प्रदीप नारंग, पुडुचेरी

**प्रकाशन स्थळ**

श्रीअरविंद सोसायटी

सोसायटी हाऊस, ११ सेंट मार्टिन स्ट्रीट, पुडुचेरी – ६०५००१

**संपादक**

डॉ. केतकी मोडक, पुणे

भ्रमणध्वनी : ९४२१०१६०८९

ई–मेल : editorabhipsa2018@gmail.com

**मुद्रक**

सेन्थिल ऑण्डवर प्रेस, पुडुचेरी – ६०५००१

**चिंतनार्थ...**

आपण सर्व वस्तुंचा वापर नीट काळजीपूर्वक केला पाहिजे. त्या वस्तुंमध्ये आपली आसक्ती असते म्हणून नव्हे तर, त्या वस्तुसुद्धा ईश्वरी चेतनाच अभिव्यक्त करत असतात म्हणून त्या नीट हाताळल्या पाहिजेत.

– श्रीमाताजी (CWM 17 : 87-88)

*

# महासरस्वती

संपादकीय....................................................................०२
महासरस्वतीचे स्वरूप आणि कार्य.......................................०३
महासरस्वतीचे दर्शन आणि अनुभूती...................................१३
योग कर्मसु कौशलम्.......................................................२१
श्रीअरविंद लिखित पत्रांमधून...............................................२९
सुसंवाद आणि व्यवस्था.....................................................३६

---

## संपादकीय

महासरस्वती ही परिपूर्णत्वाची देवता आहे. दिव्य मातेच्या महेश्वरी, महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती या चार रूपांपैकी ती सर्वात धाकटी आहे. इतर शक्तींनी केलेल्या कार्याला पूर्णत्व प्रदान करण्याचे कार्य महासरस्वती करत असते. सुसंवाद, सुमेळ, सुव्यवस्था हे तिचे स्वाभाविक गुणधर्म असतात. विद्या, कला, तंत्रज्ञान यांची ही देवता आहे.

महासरस्वतीच्या स्वरूपाचे श्रीअरविंद यांनी केलेले विवेचन अत्यंत मनोहारी आहे. तसेच श्रीमाताजींच्या जीवनामध्ये महासरस्वती या त्यांच्या रूपाचा प्रत्यय साधकांना वेळोवेळी आलेला आहे. तेव्हा, या दोन्हीच्या आधारे, महासरस्वतीचे स्वरूप आणि कार्य जाणून घेण्याचा प्रयत्न 'अभीप्सा' मासिकाच्या या अंकामध्ये केला आहे.

संपादक, अभीप्सा मासिक

**

---

अभीप्सा मासिक हे श्रीअरविंद सोसायटी, पाँडिचेरीचे मुखपत्र आहे.

---

महायोगी श्रीअरविंद म्हणजे पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक श्री. अरविंद घोष आणि श्रीमाताजी म्हणजे पूर्वाश्रमीच्या मीरा अल्फासा, (फ्रान्स). 'श्रीअरविंद आश्रम' हा भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पाँडिचेरी येथे आहे.

# महासरस्वतीचे स्वरूप आणि कार्य

## महासरस्वतीचे स्वरूप

महासरस्वती म्हणजे दिव्य मातेची कार्यकारी शक्ती आणि पूर्णतेची व सुव्यवस्थेची वृत्ती असते. महेश्वरी, महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती या चौघींमध्ये सर्वात धाकटी असणारी महासरस्वती ही तिच्या कार्यकारी क्षमतेमध्ये सर्वात कुशल आहे आणि जडभौतिक प्रकृतीच्या ती सर्वात निकट असते.

जगत-शक्तींच्या कार्याची स्थूलमानाने आखणी 'महेश्वरी'द्वारे केली जाते; त्यासाठी लागणारी ऊर्जा आणि चालना 'महाकाली' देते; 'महालक्ष्मी' त्यांचे प्रमाण आणि ताल शोधून काढते; आणि 'महासरस्वती' त्यांच्या अंमलबजावणीचे आणि त्यांच्या सुसंघटनेचे बारकावे पाहते; त्यांच्या घटकांमधील परस्पर संबंध, शक्तींचे परिणामकारक संयोजन व परिणाम आणि परिपूर्तीची बिनचूक यथातथ्यता यांच्या ती अध्यक्षस्थानी असते. विज्ञान आणि कला, वस्तुंचे तंत्र या सगळ्या गोष्टींचा महासरस्वतीच्या प्रांतामध्ये समावेश होतो. महासरस्वती स्वतःमध्ये अगदी , सूक्ष्मता आणि धैर्य, अंतर्ज्ञानी मनाची अचूकता आणि परिपूर्ण कार्यकर्त्याचे जागृत हात व भेदक नजर बाळगून असते आणि तिने ज्यांची निवड केलेली असते त्यांना ती या सर्व गोष्टी देऊ शकते.

ही शक्ती बलशाली असते, न थकणारी असते. ती सतर्क आणि तत्पर रचनाकार असते. ती सुव्यव्यस्था लावते. ती प्रशासक. ती तंत्रज्ञ, कलाकार असते. आणि ती जगतांचे वर्गीकरण करते. जेव्हा ती रूपांतरणाचे आणि प्रकृतीच्या नव्या घडणीचे कार्य हाती घेते, तेव्हा तिचे ते कार्य परिश्रमपूर्वक आणि तपशिलवारपणे चालू असते मात्र आपल्या (मनुष्याच्या) अधीरतेला ते बऱ्याचदा मंद आणि कधीच न संपणारे असे वाटते; परंतु ते कार्य दीर्घकाळ चालणारे, सर्वांगीण आणि दोषरहित असते.

तिचा तिच्या कार्यामध्ये असणारा संकल्प अत्यंत चोख असतो, सजग असतो आणि अथक असतो; आपल्यावर ती लक्ष ठेवून असते आणि त्यातील अगदी बारीकसारीक तपशिलांचीदेखील ती नोंद घेत असते; त्यांना स्पर्श करत असते; एखादा अगदी बारीक दोष, काही कमतरता असेल तर ती कमतरता, काही वाकुडेपण असेल तर ते वाकुडेपण किंवा काही अपूर्णता असेल तर ती अपूर्णता महासरस्वती शोधून काढते. ती आजवर केलेले कार्य आणि येथून पुढे करायचे कार्य विचारात घेते आणि त्याचे अचूक मोजमाप करते. तिच्या दृष्टीला कोणतीच गोष्ट अगदी लहान किंवा वरकरणी क्षुल्लक वाटत नाही; एखादी गोष्ट कितीही अस्पष्ट, प्रच्छन्न किंवा सुप्त असली तरी महासरस्वतीपासून ती लपून राहत नाही.

प्रत्येक घटकास जोवर त्याचे खरे रूप प्राप्त होत नाही तोपर्यंत त्याची घडण, त्याची पुनर्घडण करत नेणे आणि प्रत्येक घटक समग्रतेच्या दृष्टीने विचारात घेऊन, त्यास त्याच्या योग्य स्थानी ठेवणे आणि त्याचे नेमके हेतू पूर्णत्वाला नेणे, यासाठी ती परिश्रम करत असते.

तिने वस्तुंची जी नित्य व परिश्रमपूर्वक केलेली व्यवस्था आणि पुनर्व्यवस्था असते, त्यामधील सर्व गरजांवर एकाचवेळी तिची दृष्टी असते आणि त्या गरजा कोणत्या मार्गाने पूर्ण करायच्या याकडेही तिची दृष्टी असते. काय स्वीकारायचे आणि कोणत्या गोष्टीला नकार द्यायचा हे तिच्या अंतर्ज्ञानाला ज्ञात असते आणि त्यामुळे ती यशस्वीपणे सुयोग्य साधन, सुयोग्य वेळ, सुयोग्य परिस्थिती आणि सुयोग्य प्रक्रिया निर्धारित करत असते.

निष्काळजीपणा, दुर्लक्ष आणि आळस या गोष्टींचा महासरस्वतीला तिटकारा असतो. गडबड घोटाळे केलेले, घाईघाईने कसेतरी केलेले काम, अस्ताव्यस्तपणे केलेले काम, कसेही केलेले काम, बेडौल आणि विसंगती, सर्व खोटे अनुकरण आणि साधनांचा व क्षमतांचा गैरवापर आणि

गोष्टी अर्धवटपणे किंवा काही न करताच सोडून देणे हे सारे तिच्या दृष्टीने अवमानकारक असते; तिच्या प्रवृत्तीला परके असते.

जेव्हा तिच्या कार्याची सांगता झालेली असते तेव्हा कोणतीच गोष्ट राहून गेलेली नसते, कोणताच घटक अस्थानी नसतो किंवा वगळण्यात आलेला नसतो किंवा दोषपूर्ण स्थितीत तसाच सोडून देण्यात आलेला नसतो; सारेकाही ठोस, अचूक, परिपूर्ण आणि स्तुत्य असते.

परिपूर्ण पूर्णत्वामध्ये कोणतीही कमतरता राहून गेलेली असेल तर त्याने तिचे समाधान होत नाही. तिच्या निर्मितीच्या परिपूर्णतेसाठी जर आवश्यकता भासलीच तर ती अनंतकाळ परिश्रम करण्यास सिद्ध असते त्यामुळेच दिव्य मातेच्या सर्व शक्तींपैकी महासरस्वती ही माणसाच्या बरोबरीने सर्वाधिक दीर्घकाळ कष्ट सोसत आलेली आहे आणि त्याच्यातील हजारो कमतरतादेखील सहन करत आलेली आहे.

महासरस्वती ही दयाळू, हसतमुख, निकट आणि साहाय्यकारी असणारी, सहजी विन्मुख किंवा निराश न होणारी, पुन्हापुन्हा अपयश आले तरीदेखील अडिग राहणारी असते. आपला (मनुष्याचा) संकल्प जर एककेंद्री असेल, सरळमार्गी आणि प्रामाणिक असेल तर, प्रत्येक पावलागणिक तिचा कृपाहस्त आपला सांभाळ करत असतो. तिला द्विधा मनःस्थिती खपत नाही आणि नाटकीपणा, आत्मवंचना व ढोंग याबाबत ती निर्दय असल्याचे तिच्या भेदक शैलीमधून प्रकट होते.

आपल्या गरजेच्या वेळी मातारूपाने धावून येणारी, आपल्या अडीअडचणींच्या वेळी आपली सुहृद बनणारी, चिकाटी बाळगणारी आणि शांत अशी समुपदेशक व मार्गदर्शक असणारी, मळभ, वितुष्ट आणि नैराश्याचे ढग देदीप्यमान हास्याने पळवून लावणारी अशी ती, आपल्याला तिच्या सदातत्पर साहाय्याची आठवण करून देत असते; ती शाश्वत सूर्यप्रकाशाकडे निर्देश करत असते; ती दृढ, शांत असते आणि उच्चतर प्रकृतीच्या समग्रतेकडे आपल्याला घेऊन जाणारी सातत्यपूर्ण आणि गहन

अशी प्रेरणा असते, त्याबाबत चिकाटी बाळगणारी असते.

इतर शक्तींचे कार्य पूर्णत्वासाठी तिच्यापुढे लीन झालेले असते; कारण ती त्या कार्यास भौतिक आधार पुरविते. तपशिलवारपणाने त्याचा विस्तार करते आणि संरचनांचे कवच उभारून त्यास मजबूत करते.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 22-23)

*

## श्रद्धेच्या परिपूर्तीची परमावधी

महासरस्वती ही आत्म्याचे कर्म आणि दिव्य कौशल्य यांची देवता आहे. योग कर्मसु कौशलम्, दिव्य ज्ञानाचा उपयोग आणि जीवनामध्ये चैतन्याचे आत्म–उपयोजन (self-application) आणि त्याच्या सुसंवादाचे सौख्य हा तिचा योग आहे.

तिच्या सर्वच रूपांमध्ये व शक्तींमध्ये, शाश्वत ईश्वरीच्या प्रभुत्वसंपन्नतेची परमश्रेष्ठ भावना असते. साधनाकडून (instrument) अपेक्षित असलेली सर्व प्रकारच्या कृतींची जलद आणि दिव्य क्षमता, एकत्व, सहभागी सहानुभूती तिच्या ठायी असल्यामुळे, सर्व जिवांमधील सर्व शक्तींशी मुक्त तादात्म्य महासरस्वतीमध्ये असते आणि त्यामुळे, विश्वामधील सर्व ईश्वरी संकल्पाशी उत्स्फूर्त आणि फलदायी असणारी एक सुसंवादिता तिच्यामध्ये असते.

तिच्या अस्तित्वाची व तिच्या शक्तीची अतिशय सघन जाणीव होणे आणि आपल्या सभोवताली व आपल्या सर्वांगामध्ये होत असलेल्या तिच्या कार्याविषयी आपल्या समग्र अस्तित्वाने संतोषपूर्वक सहमती देणे, ही महाशक्तीवरील श्रद्धेच्या परिपूर्तीची परमावधी असते.

– श्रीअरविंद (CWSA 24 : 781)

*

## महासरस्वतीचे प्रियजन

(श्रीअरविंदलिखित ‘द मदर’ या ग्रंथातील एक उतारा श्रीमाताजी वाचतात. हा उतारा पुढीलप्रमाणे...)

महासरस्वती म्हणजे दिव्य मातेची कार्यकारी शक्ती आणि पूर्णतेची व सुव्यवस्थेची वृत्ती. महेश्वरी, महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती या चौघींमध्ये सर्वात धाकटी असणारी महासरस्वती ही तिच्या कार्यकारी क्षमतेबाबत सर्वात कुशल आहे आणि जडभौतिक प्रकृतीच्या ती सर्वात निकट असते...

महासरस्वती स्वतःमध्ये अगदी हृदयस्थ व नेमके ज्ञान, सूक्ष्मता आणि धैर्य, अंतर्ज्ञानी मनाची अचूकता आणि परिपूर्ण कार्यकर्त्याचे जागृत हात व भेदक नजर बाळगून असते आणि तिने ज्यांची निवड केलेली असते त्यांना ती या सर्व गोष्टी देऊ शकते.

(श्रीमाताजी वरील उताऱ्यावर भाष्य करतात...)

क्रमवारीनुसार पाहता महासरस्वती ही सर्वात शेवटी आविष्कृत झाली आहे. तिच्या वैशिष्ट्यपूर्ण प्रकृतीनुसार, तिच्या स्पंदनांचे जे गुणधर्म असतात त्यानुसार ती अगदी लहान मुलांशीसुद्धा हितगुज साधू शकते. तरुण मुलं, लहान मुलं, ज्यांची घडण अजून होत आहे अशा गोष्टी तसेच रूपांतरणासाठी आणि परिपूर्णतेला पोहोचण्यासाठी ज्यांच्यासमोर एक दीर्घ मार्ग खुला झालेला आहे अशी माणसं तिला प्रिय असतात. तिला



## असे वरदान दे...

(जे ईश्वराची सेवा करू इच्छितात त्यांनी ही प्रार्थना जरूर करावी...)

सर्व अडथळ्यांवर मात करून विजयी होणाऱ्या हे प्रभू, तुझा जयजयकार असो.

आमच्यातील कोणतीही गोष्ट तुझ्या कार्यात अडसर ठरू नये, असे वरदान दे.

तुझ्या आविष्करणामध्ये कशामुळेही विलंब होऊ नये, असे वरदान दे.

सर्व गोष्टींमध्ये आणि प्रत्येक क्षणी तुझीच इच्छा कार्यरत राहील, असे वरदान दे.

हे प्रभू, आमच्या प्रत्येक तत्त्वामध्ये, आमच्या अस्तित्वाच्या प्रत्येक क्रियेमध्ये, आमच्या सर्वोच्च उंचीपासून ते आमच्या देहाच्या अगदी सूक्ष्मतम अशा पेशींपर्यंत तुझा मानस आमच्यामध्ये परिपूर्ण व्हावा, म्हणून आम्ही तुझ्यासमोर उभे आहोत.

आम्ही तुझ्याप्रत पूर्णपणे आणि सदोदित एकनिष्ठ राहू, असे वरदान दे.

इतर कोणत्याही प्रभावाविना आम्ही पूर्णत: तुझ्याच प्रभावाला खुले राहू, असे वरदान दे.

आम्ही तुझ्याप्रत एक प्रगाढ आणि उत्कट कृतज्ञता बाळगण्यास कधीही विसरणार नाही, असे वरदान दे.

तुझ्याकडून प्रसादरूपाने, हरघडी मिळालेल्या अद्भुत गोष्टींचा आमच्याकडून कधीही अपव्यय होणार नाही, असे वरदान दे.

आमच्यातील सर्व काही तुझ्या कार्यात सहभागी होईल आणि तुझ्या साक्षात्कारासाठी सज्ज होईल, असे वरदान दे.

सर्व साक्षात्कारांचा परमोच्च स्वामी असणाऱ्या हे प्रभू, तुझा जयजयकार असो.

आम्हाला तुझ्या विजयाबद्दलची सक्रिय आणि उत्कट, संपूर्ण आणि अविचल अशी श्रद्धा प्रदान कर.

– श्रीमाताजी (CWM 01 : 382)

**

## मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न 'अभीप्सा' या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या 'ऑल इंडिया मॅगेझिन' या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे 'अभीप्सा.' १९७५ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

### वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक)
तीन वर्षांचे दर : ५८० रू. (३६ अंक)
पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक)
देणगीदार : ४००० रू.
(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

### वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society
बँकेचे नाव : Central Bank of India, Pondicherry Branch
IFSC Code : CBIN0281354
A/C No. : 1235467709

*

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

# श्रीमाताजींची बोलकी कृती

(श्रीअरविंद-आश्रमातील एक साधक श्री. अभय सिंग यांनी सांगितलेली ही एक आठवण...)

चंदुलाल नावाचे एक अभियंता होते. त्यांची मातृभाषा गुजराथी होती पण ते फ्रेंच भाषेत उत्तम बोलू शकत असत आणि लेखन करू शकत असत. आश्रमात येणाऱ्या आमच्यासारख्या नवोदितांना श्रीमाताजींचे लेखन मूळातून वाचणे आणि त्यांच्याशी संवाद साधणे शक्य व्हावे म्हणून आम्ही फ्रेंच भाषा शिकावी असा चंदुलाल यांचा आग्रह असे. ते अतिशय उत्साही होते.

फ्रेंच भाषा शिकवता शिकवताच श्रीमाताजींच्या साहित्याशी आमचा परिचय व्हावा म्हणून ते आम्हाला श्रीमाताजींच्या पुस्तकातील काही उतारे अभ्यासाला देत असत. व्याकरणापासून आरंभ करून निबंधलेखनापर्यंत त्यांनी आम्हाला सारेकाही शिकविले. श्रीमाताजी स्वतः आम्हा विद्यार्थ्यांच्या वह्या तपासत असत. श्रीमाताजी त्यांच्या प्रचंड व्यापातून आम्हा विद्यार्थ्यांच्या वह्या तपासण्यासाठी एवढा वेळ कसा काढू शकत याचे आम्हाला कोडेच होते.

येथे एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे की, त्यावेळी श्रीअरविंद-आश्रमाची संपूर्ण जबाबदारी एकट्या श्रीमाताजींवर होती, ऑरोविलच्या निर्मितीचे काम वेगाने चालू होते. आणि हे सगळे चालू असतानाच त्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सर्व प्रकारचे प्रयत्न करत असत. एखाद्या विद्यार्थ्याचे हस्ताक्षर चांगले नसेल तर ते सुधारण्यासाठी त्या विद्यार्थ्याला त्या मदत करत असत. त्यांच्या प्रेमळपणाला सीमाच नव्हती.

या एका कृतीतूनसुद्धा श्रीमाताजींनी आमच्यामध्ये हे मूल्य रुजविले की, कोणतीच गोष्ट लहानसहान, किरकोळ नसते. आपण करत असलेल्या कामामध्ये आपण नेहमी महासरस्वतीला अपेक्षित असणाऱ्या परिपूर्णत्वाकडे लक्ष दिले पाहिजे.

आधारित – (Mother and Abhay : 41-42)

*

## आजवर दर्शनदिनी देण्यात आलेले संदेश (क्रमशः)

### २४ नोव्हेंबर २००८

आपल्याला जीवन जी संधी प्रदान करते त्या संधीचे सोनं करावे अशी तुमची इच्छा असेल; आपल्याला (अध्यात्मजीवनाची जी) हाक आलेली आहे तिला योग्य रितीने प्रतिसाद द्यावा असे जर तुम्हाला वाटत असेल आणि आपल्याला ज्या ध्येयाचे दर्शन झाले आहे, त्या ध्येयाप्रत थोडीफार वाटचाल करणे नव्हे तर, ते ध्येय साध्य करावे अशी जर तुमची इच्छा असेल तर त्यासाठी, संपूर्णपणे आत्मदान करणे आवश्यक असते.

ते ध्येय तुमच्या जीवनाचा नुसता महत्त्वपूर्ण भाग असणे पुरेसे नाही तर, ते ध्येय हे तुमचे जीवनच झाले पाहिजे. जीवनातील अनेकानेक ध्येयांपैकी एक, एवढेच त्याचे मोल असता कामा नये तर, ते तुमच्या जीवनातील एकमेवाद्वितीय ध्येय असले पाहिजे ; आणि हेच पूर्णयोगाच्या यशाचे गमक आहे.

– श्रीअरविंद (CWSA 23-24 : 71)

*

### ०५ डिसेंबर २००८

मी येथे कोणतेही चमत्कार करण्यासाठी आलेलो नाही तर, आपल्या मानवी प्रकृतीच्या महान आंतरिक परिवर्तनाचा मार्ग दाखविण्यासाठी, त्या मार्गावर प्रगत कसे व्हायचे हे दाखविण्यासाठी आणि त्यासाठी आवश्यक असणारे साहाय्य करण्यासाठी आलो आहे. आंतरिक रूपांतरण प्रत्यक्षात येऊन, जेव्हा ते स्वतःहून बाह्यवर्ती दिशेने विस्तारित होईल तेव्हाच, या जगामध्ये बाह्य परिवर्तन होणे शक्य आहे.

– श्रीअरविंद (CWSA 36 : 231)

*